# नवी मुंबई महानगरपालिका

# Navi Mumbai Municipal Corporation

कार्यालय : नमुंमपा मुख्यालय, भूखंड क्र. १,
किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर -१५ए,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : ०२२-२७५६ ७०७०/१/२/३/४/५
फॅक्स : ०२२-२७५७७०७०

**Head Office:** Plot No.1,
Near Kille Gaothan, Palmbeach Junction,
Sector 15A, C.B.D. Belapur, Navi Mumbai -400 614.
Tel : 022 - 2756 7070 / 1/2/3/4/5
Fax : 022 - 2757 7070


**परिपत्रक**

जा.क्र.नमुंमपा/नरवि/ससंनर/३७६६८/२०२३
दिनांक : १८/०५/२०२३

**विषय :** शासन निर्देशानुसार BPMS कार्यप्रणालीद्वारे Online पध्दतीने देण्यात येणाऱ्या बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र तसेच अंतर्गत फेरबदल व इतर परवानग्या मध्ये अंतर्भुत करावयाच्या अटी व शर्ती.

शासनाने दि.०१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्राप्त होणारे विकास परवानगी प्रस्ताव दि.०१/०१/२०२२ पासून BPMS संगणक प्रणालीद्वारे Online स्विकारुन अशा प्रस्तावांना मंजुरी देण्याची कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या या विकास प्रस्तावांची छाननी शासन निर्देशानुसार BPMS Online होत आहे. सदर BPMS प्रणालीची अंमलबजावणी शासन निर्देशानुसार दि.०१/०७/२०२२ पासून नमुंमपाने सुरु केलेली असून सदर प्रणाली कार्यरत आहे.

सदर कार्यप्रणालीद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध बांधकाम व इतर ऑनलाईन परवानग्या मधील पत्रामध्ये नमुद अटी व शर्ती व्यतीरिक्त खालील अटी व शर्ती अंतर्भुत करण्यात येत आहेत.

१) पाणी पुरवठा व मलनि:स्सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

२) सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळुन आल्यास आपणावर कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविण्यात येईल किंवा सुधारीत बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

३) बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे / सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक / भुखंडधारक / गाळेधारक यांची राहिल. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांस कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) भुखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी (Ground Level) भरणी करुन उंच करावी. जमीनीची पातळी ही रस्ता आणि Sewer Line यांच्या पेक्षा उंचावर असली पाहिजे. सांडपाणी, पावसाळयाचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भुखंडामध्ये पाणी साचणार नाही अशी भुखंडाची पातळी तयार करावी.

५) इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजुर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

६) इमारतीचे बांधकाम करणारे मजुरांचे निवासीकरीता (Labour Shed) भुखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातुन त्यांचे तात्पुरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भुखंडाचे एका बाजुचे सामासिक अंतरात तात्पुरती शेडस् टॉयलेट करण्यास परवानगी देणेत येत आहे. याबाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढुन टाकणेत यावी.

**कृ.मा.प.**

७) बांधकाम सुरु करताना कामाचे नाव, बांधकाम परवानगीची तारीख, वास्तुविशारदाचे नांव, जमिन मालकाचे नांव, ठेकेदाराचे नांव, बांधकाम क्षेत्र इ. बाबी दर्शविणारा फलक लावण्यात यावा. महानगरपालिकेस माहीतीसाठी ठेकेदाराचे नाव व दुरध्वनी क्रमांक इ. बाबतचा तपशील काम सुरु केल्यानंतर या कार्यालयास पाठविण्यात यावा, ही विनंती.

८) प्रस्तुत भुखंडावरील इमारतीचे बांधकाम करीत असतांना बांधकामामुळे आजुबाजुच्या नागरीकांना प्रदुषणाचा त्रास होणार नाही तसेच बांधकाम प्रगतीपथावर असताना बांधकामावरील मजूर अथवा सभोवतालच्या परिसरामधील नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी National Building Code मधील तरतुदींचे तसेच अनुषंगीक कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन / अंमलबजावणी करणे संबंधीत भुखंडधारक / विकासकांवर बंधनकारक राहिल. जर भविष्यात आपले मालकीच्या भुखंडावर चालु असलेल्या बांधकामामुळे जिवीत अथवा सार्वजनिक / खाजगी मालमत्तेस कुठल्याही प्रकारची हानी झाल्यास त्यास संबंधीत भुखंडधारक /विकासक हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

९) प्रस्तुत भुखंडावर भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणेपूर्वी आपले भुखंडाचे आजुबाजुस असणा-या सार्वजनिक स्वरुपाचे पदपथ, रस्ते, गटारे, जलवाहिन्या, मलनि:स्सारण वाहिन्या इत्यादी बाबीस काही हानी पोहोचले असल्यास सदर बाबी पुर्ववत करण्याची सर्वस्वी जबाबदारी भुखंडधारकाची /विकासकाची राहील अन्यथा भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१०) प्रस्तुत प्रकरणात सादर करण्यात आलेली कुठलीही माहिती / कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

११) नवी मुंबई महानगरपालिकेची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणेत आलेली आहे. उक्त विकास योजनेमधील अंतिम प्रस्ताव अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल.

१२) मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीबाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे निदेश/ स्पष्टिकरण अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहतील. आवश्यकतेप्रमाणे शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निदेशामुळे नकाशे सुधारीत करुन घेणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे सुधारीत प्रस्तावास मान्यता घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल.

१३) प्रकरणी कोणताही वाद न्यायप्रविष्ठ असल्यास न्यायालयाचे आदेश अंतिम समजून ते जसेच्यातसे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहतील. न्यायालयाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार आवश्यकतेप्रमाणे नकाशे सुधारीत करुन घेणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे सुधारीत प्रस्तावास मान्यता घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल.

(राजेश नार्वेकर)
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

D:\Sanjana\Letter 2023.docx